**शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**

हत्तीमहाल, सोमवार पेठ, गंजी गल्ली कोल्हापूर ४१६००२
वेबसाईट www.dydekop.org.in ईमेल dydekop@gmail.com

**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळा- परवानगी आदेश** जा.क्र.उमार२/कोवि/स्वंअशा/पर/१३-१४/133931-36

शासन निर्णय अनु. क्रमांक **१२६१** दिनांक - 30 SEP 2013

प्रति,

अध्यक्ष/सचिव

राजश्री फौंडेशन जयसिंगपूर, ता.शिरोळ

विषय :- सन 2013-2014 या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्या बाबत.

संदर्भ 1) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (म. शासन असाधारण 4,6 व 24)

2) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक स्वयंअ-2013/(85/13) माशि-1/ मंत्रालय मंबई 32 दिनाक 15 जन 2013.

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2013-2014 मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विदयमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार संस्थेस संदर्भ क्र. 02 च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता खालील अटी व शर्तीस अधीन राहून परवानगी देणेत येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नविन शाळा/दर्जावाढ | शाळा प्रकार | परवानगी वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **राजश्री फौंडेशन जयसिंगपूर, ता.शिरोळ** | **दिप उच्च माध्यमिक स्कूल, मौजे संभाजीपूर (जयसिंगपूर ग्रामीण), ता.शिरोळ** | मराठी | नवीन शाळा | उच्च माध्यमिक | २०१३-२०१४ |

1) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

2) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

3) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष 2013-2014 पासून असेल.

4)शैक्षणिक वर्ष 2013-2014 मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरीक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

5) परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

6) परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळा यांना केंद्र व राज्य शासनाचे शिक्षण विषयक अधिनियम, नियम, वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

7) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/ दर्जावाढ वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

8) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

9) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

10) नवीन/दर्जावाढ शाळांमध्ये शासन निर्णय दि.29/6/2013 नुसार भौतीक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील. प्राथमिक शाळांच्या संदर्भात RTE act.2009 मध्ये नमुद केलेल्या सर्व मानकांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

Rajashree Foundation's
Inward No. - 5
Date :- 27/11/2013
Forwarded To- Manager

## शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

हत्तीमहाल, सोमवार पेठ, गंजी गल्ली कोल्हापूर ४१६००२
वेबसाईट www.dydekop.org.in ईमेल dydekop@gmail.com

11) अधिनियमातील तरतूदीनुसार संस्था वरील वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास कायमपणे आर्थिकदृष्टया सक्षम असली पाहिजे.या वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी दिली असल्याने भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत शासनाकडून देण्यात येणार नाही.

12) शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल,स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

13)शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.तसेच नियुक्त शिक्षक वर्गाची सक्षम प्राधिका-यांकडून मान्यता घेतली पाहिजे.तसेच सदर कर्मचा-यांचे वेतन व भत्ते नियमानुसार संस्थेने दिले पाहिजे.

14) संस्थेकडील भौतिक सुविधा,व्यवस्थापन विषयक सुविधा इ.शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे. शासन निर्णय दि. 29/6/2013 मध्ये दिलेल्या मूलभूत सुविधांच्या निकषांची पूर्तता असणे आवश्यक आहे.

15) संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.तसेच अभ्यासक्रम,पाठयपुस्तके,मूल्यमापन पध्दती शालेय व सहशालेय/कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

16) संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचा-यांसाठी विहित नोंदवहया अदयावत व विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

17)संस्थेने/शाळेने माध्यमिक शाळा संहिता,महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली 1981 मधील तरतुदी तसेच शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे,कार्यपध्दतीचे,नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

18) शासन निर्णय दि.3/11/2009 नुसार व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शाळेची इमारत नॅशनल बिल्डींग कोड नुसार असणे आवश्यक आहे.

19) शाळेने ज्या अभ्यासक्रम मंडळाशी संलग्न होण्यासाठी या अधिनियमाअंतर्गत परवानगी मागणी केलेली असेल त्या अभ्यासक्रम मंडळ संलग्नतेसाठी प्रचलित नियमानुसार विहित नमुन्यात व कार्यपध्दतीनुसार शिक्षण उपसंचालक यांचेकडे अर्ज करेल.

**20) प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सादर करताना दाननिधीची मूळ पावती शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचेकडे सादर करावी. शिक्षणाधिकारी यांनी सदर मूळ पावती जतन करुन ठेवावी व आवश्यकतेनुसार संबंधिताकडून ठेव पावतीचे नूतनीकरण करुन घेणेत यावे.**

**21) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व माध्यमिक शाळा संहिता मधील तरतुदीची पूर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा प्रथम मान्यतेकरिता प्रस्ताव एक महिन्याच्या आत विहित नमुन्यात सक्षम अधिका-याकडे (प्राथमिक शाळेबाबत शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेबाबत शिक्षण उपसंचालक)सादर करणे आवश्यक राहील. मुदतीत प्राप्त न झालेल्या प्रस्तावाना मान्यता नाकारणेत येतील.**

(व्ही. बी. पायमल)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

1)प्रतिलिपी : माहितीस्तव सविनय सादर

1) मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई.

2) मा.शिक्षण संचालक, (माध्य. व उच्च माध्य./ प्राथमिक ) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-1.

3) संबंधित संस्था अध्यक्ष/सचिव/ मुख्याध्यापक. यांना माहितीसाठी.

4) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक ) जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

51